# Question Paper
## Set- II
## Std. – 10th MM/Semi
## Subject – Marathi H.L.



**Time: 3 hrs** **Marks: 80**

### विभाग – १ गद्य

**प्र.१ अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.** २

| | | |
|---|---|---|
| गुलाबी पानांच्या रेशमी पताका नाचवणारे | → | |
| घराजवळ असलेले झाड | → | |
| झाडाला वेढणारी वेल | → | |
| वृक्ष वनस्पतींचा दुष्काळ असणारे राज्य | → | |

चैत्रातल्या पालवीचे रूप कुठेही मोठे मनोहर; पण ही पिंपळाची झाडे पाहा, कशी गहि-या गुलाबी पानांच्या रेशमी पताका नाचवत उभी आहेत ती. जुनी पाने गळता गळता नवी येत होती म्हणून शिरीषासारखी ही पालवी पाहिल्याने डोळ्यांत भरत नव्हती; पण सारी नवी पाने आल्यावर खरोखरच उन्हात जेव्हा ही भडक गुलाबी पाने चमकतात, तेव्हा जणूकाही सुंदर पुष्पांचे गेंदच या झाडावर फुलले आहेत असे वाटते. इतर झाडांची पालवी फार लहान असल्याने फार हालत नाही; पण या पानांची सारखी सळसळ. त्यातल्या त्यात आमच्या घराजवळ एक पिंपळाचे झाड आहे, ते तर फारच बहारीचे दिसते. त्याच्यावर मधुमालातीची प्रचंड वेल चढली आहे. चारी बाजूंनी अगदी मध्यापर्यंत त्या झाडाला तिने वेढून टाकले आहे आणि आता ही मधुमालती गुलाबी गेंदांनी खच्चून भरली आहे. आता फुलायला आणखी जागा नाही, अशी दाटी पिंपळाच्या तांबूस पानांची आणि या गुच्छांची झाली आहे आणि नुसती पालवीच नाही तर हिरवी फळे ही इतर झाडांप्रमाणे यांच्या फांदीफांदीला ओळीने चिकटून बसली आहेत.

सर्व फुलांत अतिशय हिरिरीने कोणी नटले असेल तर ही उग्रगंधी घाणेरी, किती शोभिवंत आणि दुरंगी फुलांच्या गुच्छांनी ती भरली आहे. गुलाबी फुलांत एखादे पिवळे, पिवळ्यांत एखादे गुलाबी, शेंदरी व पिवळा, पिवळा आणि जांभळा, लाल आणि पांढरा, जांभळा आणि गुलाबी, शेंदरी आणि जांभळा किती म्हणून या झाडाच्या दुरंगी फुलांच्या रंगांचे वर्णन करावे? वास्तविक हे कुठलेच दोन रंग स्वाभाविकपणे एकमेकांच्या शेजारी एरवी शोभणारे नाहीत; पण निसर्गाच्या दुनियेत कुठलेही भडक व एरवी विसंगत वाटणारे रंग विषोभित दिसत नाहीत, उलट एकमेकांची शोभा वाढवतात. गुजरातेत ब-याच भागांत वृक्ष वनस्पतींचा दुष्काळ. तिथे या झाडाला भलतेच महत्त्व आहे. आपण तुच्छतेने घाणेरी म्हणतो तिला आणि तिच्या अतुलनीय रंगसौंदर्याला उपेक्षून पुढे जातो;

२) **कोष्टक पूर्ण करा.** २

| | घाणेरीच्या दुरंगी फुलांच्या रंगाचे वर्णन | |
|---|---|---|
| | | |
| | | |

३) चैत्रातल्या पिंपळाच्या नवपालवीचे रूपाचे सौंदर्य तुमच्या शब्दात लिहा. ३

**ब) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) कोष्टक पूर्ण करा.** **२**

| | |
|---|---|
| कापसासारखे पांढरे शुभ्र केस असलेली | -------------- |
| सुभाषची मुलगी | -------------- |
| सोन्यासारखे केस असलेली | -------------- |
| लेखकाचे डॉक्टर मित्र | -------------- |

आजून तो दिवस आठवतोय मला. २९ ऑगस्ट, १९७३. वेळ सायंकाळची. डॉ. चित्रे यांनी छोटासा पिंजरा तयार करूनच ठेवला होता. त्या तीन पिलांना त्यांनी मादीपासून दूर केलं आणि म्हणाले, "हो, डॉक्टर, सांगा तुमचा चॉइस." तिन्ही बछड्यांना जन्मून दोन महिने झाले होते. मी तिन्ही पिल्लांना गोंजारलं; पण सगळीच फिसकन अंगावर आली. मी त्यातल्या त्यात कमी फिसकारणारं, थोड्या शांत स्वभावाचं एक पिल्लू निवडलं. ते इतरांपेक्षा थोडं सशक्तही होतं. बच्च्याला आम्ही पिंज-यात ठेवलं. रात्रभर प्रवासात माझ्या मनात त्या छाव्याशिवाय दुसरा कशाचाच विचार नव्हता. दोन वर्षांचे झाले, की वाघ-सिंह पूर्ण ताकदीचे होतात. मग त्यांना शिकवणं, माणसाळवणं अवघड असतं. पुन्हा माझ्या डोळ्यांसमोर नुसतं सर्कशीसारखं वन्य पशूंना ट्रेनिंग देणं हा हेतू नव्हता. मला एका जंगली जनावरावर प्रेम करायचं होतं. अगदी पोटच्या मुलासारखं. ती जेवल्याखेरीज मी जेवणार नव्हतो. तिला जवळ घेतल्याखेरीज मी झोपणार नव्हतो. आजपर्यंत पूर्णपात्रे घराण्यातील पराक्रमी लोकांनी शिकार करुन किर्ती मिळवली होती; पण पशुमधील पशुत्वाची आज मी शिकार करायला निघालो होतो. आम्ही घरात प्रवेश केला. पहिला दिवस तसाच गेला. या सिंहकन्येचं आगमन होण्यापूर्वी पंधरा दिवस 'रूपाली' चं आगमन झालं होतं कापसासारखे शुभ्र पांढरे केस असलेली दीड महिन्यांची ही कुत्री आमच्या घरात सर्वांची लाडकी झाली होती. तिचे ते रूपेरी केस पाहून आम्ही तिचं नाव 'रूपाली' ठेवलं होतं. माझा मुलगा डॉ. सुभाष याला पहिली मुलगी झाली. घरात दीप आला, म्हणून आत्यानं, म्हणजेच सूचेतानं सुचवलेलं 'दीपाली' नाव ठेवलं. म्हणजेच एकाच ऑगस्ट महिन्यात (१९७३) आमच्या संगम बंगल्यात 'रूपाली' आली, नात 'दीपाली' आली आणि आता सिंहकन्याही आली होती. असा हा मनोहर त्रिवेणी संगम इथं झाला होता. काय बरं या छाव्याचं नाव ठेवावं? सोन्यासारखे केस असलेली सुवर्ण कांतीची ती मादी कोचावर बसली होती. तिच्या पाठीवरुन हात फिरवताना एकदम मला नाव सुचलं – 'सोनाली'.

**२) योग्य घटनाक्रमानुसार लिहा.** **२**

अ) सोनाली घरी आली. ब) लेखकाच्या घरी दीपालीचा जन्म.

क) रूपालीचे लेखकाच्या घरी आगमन. ड) सिंहीणीचे नाव ठेवले 'सोनाली.'

३) वरील उता-यातून जाणवणारे लेखकाचे स्वभावगुण व त्यांची वृत्ती स्पष्ट करा. **३**

**क) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१) अ) पूर्ण करा. **१**

……........ ← काव्यात असते → ……........

ब) पूर्ण करा. **१**

| | | |
|---|---|---|
| दुःखामधून कवी निर्माण करतो | → | |
| दुःखामधून विनोदी माणूस निर्माण करतो | → | |

| |
|---|
| दु:खांनी भरलेल्या जगात असहाय्य माणसाने कसे जगायचे? ही दु:ख नाहीशी करण्याचे सामर्थ्य तर त्यांच्या अंगी नाही; पण निदान ह्या दु:खाच्या नांग्या त्याला तोडता आल्या आणि त्याच्या यातना त्याला कमी करता आल्या तरी त्याला तेवढे पुरे आहे. जगातील दु:खांकडे गांभीर्याने पाहिले तर ती वाढतात आणि खेळकरपणाने पाहिले तर ती कमी होतात. हे प्रथम ज्या माणसाच्या लक्षात आले तो खरा विनोदाचा जनक असे म्हणावयास हरकत नाही. दु:खांना हसवायचे. हसून ती विसरून जावयाचे हा विनोदाचा खरा हेतू आहे. जगातील दु:खे हाच खरा विनोदाचा विषय आहे. काव्यात केवळ आनंदच असतो आणि दु:ख नसते असे नाही; पण दु;खाकडे पाहण्याच्या, काव्याच्या आणि विनोदाच्या दृष्टिकोनात फार मोठे अंतर आहे. दु;खामधून कवी करूणरस निर्माण करतो. तर विनोदी माणूस त्याच दु:खांना हास्यरसाच्या पुरात बुडवून टाकतो. |

२) एका वाक्यात उत्तरे लिहा. २

अ) दु:खे कशामुळे वाढतात? ब) दु:खे कशामुळे कमी होतात?

## विभाग – २ गद्य

**प्र. २ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) कोष्टक पूर्ण करा.** २

| वस्तूची माणसासारखी असणारी वैशिष्ट्ये लिहा | |
|---|---|
| .................. | .................. |
| .................. | .................. |

| | |
|---|---|
| वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण<br>जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.<br>वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते<br>असल्यासारखे वागलो तर वस्तू<br>प्रचंड सुखावतात.<br>वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,<br>तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.<br>वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,<br>त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून<br>निष्कासिक न होण्याची हमी द्या. | वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,<br>हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.<br>वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.<br>त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह<br>नंतरच्या काळातही.<br>आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या<br>हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा<br>कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क<br>शाबूत ठेवावा. |

**२) कारणे लिहा.** २

अ) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत, कारण.......

ब) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही, कारण......

३) 'वस्तूंनाही आवड असते स्वच्छ राहण्याची' याबद्दलचा तुमचा दृष्टीकोन स्पष्ट करा. २

४) 'वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या, तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना' या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा. २

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

**तू झालास मूक समाजाचा नायक किंवा उत्तम लक्षण**

१) कवितेचे कवि / कवयित्री – १

२) कवितेचा रचनाप्रकार – १

३) कवितेतून मिळणारा संदेश – २

**क) रसग्रहण – खालील ओळींमधील रसग्रहण तुमच्या शब्दांत लिहा**. ४

"भातुकलीतून प्रवेशताना वास्तवात, हातांत हात असेल दोघांचाही."

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र. ३ कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

१) 'माणुसकी पेरणे काळाची गरज' या विधानाचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.

२) टीप लिहा – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

३) 'कठोर परिश्रमामुळेच स्वाती महाडिक यांना स्वतःचा निर्धार पूर्ण करता आला' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र. ४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

१) **समास – कोष्टक पूर्ण करा.** २

| समासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| प्रतिक्षण | प्रत्येक क्षणी | …………… |
| बारभाई | …………… | द्विगू समास |
| …………… | लोकांना प्रिय | विभक्तीतत्पुरूष समास |
| नेआण | ने आणि आण | …………… |

२) **शब्दसिद्धी.**

अ) दोन अभ्यस्त शब्द लिहा. – जसे वळवळ १

i) ………… ii) ………..

ब) 'अ' हा उपसर्ग असलेले दोन शब्द लिहा. १

i) ……….. ii) …………

३) **वाक्प्रचार – पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** ४

i) तोंडावर येणे – …………….. ii) कपाळाला आठी घालणे – ……………..

ii) गुण्यागोविंदाने नांदणे – …………….. iii) उपेक्षा करणे – ……………..

**आ) भाषासौंदर्य.**

१) **शब्दसंपत्ती.** २

i) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.

अ) ज्याचे आकलन होत नाही असा – ……… ब) कोणतेही काम जबाबदारीने न करणारा – …………

ii) समानार्थी शब्द लिहा. १

अ) वसुंधरा – ……… ब) आनंद – ………

iii) विरुद्धार्थी शब्द वापरुन वाक्य पुन्हा लिहा. १

अ) सावकाश – ……… ब) गोंधळ – ………

**२) लेखननियमांनुसार लेखन** – अचूक शब्द ओळखा. २

i) नीर्णय / निर्णय / नीणर्य / निरणय ii) मृत्यू / मृत्यु / मुत्यु / मरुत्यू

iii) शताब्दि / शताबदी / शताबदि / शताब्दी iii) प्रसीद्ध / प्रसिद्ध / प्रसीदध / प्रसिधद

**३) विरामचिन्हे** – दिलेल्या वाक्यात विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा. १

काय मालक हे कासव कोठून आणलं तो किती सावकाश काम करतो बघा.

**४) पारिभाषिक शब्द.** १

i) खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.

अ) Selection – …………… ब) Now – ……………

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र.५ अ) पुढील दोनपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** ६

१) खालील जाहिरात वाचून कोणतेही एक पत्र लिहा.

**ड्रामा किंग**
नाटक, चित्रपट, वेशभूषा, शूटिंग यासाठी
सर्व प्रकारचे कपडे भाड्याने मिळतील.
• कपड्यांचा उत्तम दर्जा • स्वच्छता
• डोअर डिलिव्हरी • रास्त दर यासाठी प्रसिध्द
पत्ता – ड्रामा किंग,
एरंडवणे, पुणे – ४११००४
फोन नं. २५५५६६६६

तुमच्या शाळेतील स्नेहसंमेलन व वेशभूषा स्पर्धेसाठी लागणारी सामग्री मागविणारे पत्र विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने लिहा.

**किंवा** – वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल मित्राला मैत्रिणीला अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**२) सारांशलेखन** – प्र.१ क मधील अपठीत गद्य उता-याचा एक तृतियांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. ६

**आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

**१) जाहिरात लेखन** – तुमच्या परिसरात नव्याने सुरू होत असलेल्या प्रगती वाचनालयाची जाहिरात तयार करा. ५

**२) बातमीलेखन** – खालील मुद्द्यांवरून बातमीलेखन करा. ५

■ तितली वादळाचे बारा बळी ■ नागरिकांसाठी छावण्या
■ ओरिसात पूरस्थिती गंभीर ■ वादळग्रस्त जिल्हे गंजम,

गजपती, रायगडपुरी, कंधामल, केंद्रपाडा या जिल्ह्यांना वादळ आणि पुराचा तडाखा
■ येत्या २४ तासात पश्चिम बंगालमधील किनारपट्टी भागात
सोसाट्याच्या वा-यासह पाऊस पडण्याची शक्यता.

३) **कथालेखन** – खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा. योग्य शीर्षक द्या. ५

मुद्दे – एक मुलगा--- आईबरोबर झोपडीत राहणे --- पावसाळ्याचे दिवस --- भयंकर वारा व पाऊस --- रेल्वे रूळ उखडणे --- त्याच्या नजरेत येणे --- अंगातला तांबडा शर्ट काढून आगगाडी थांबविणे --- प्रवाशांचा संताप --- ड्रायव्हरची रुळांवर नजर पडणे --- रुळ उखडलेले दिसणे --- मुलामुळे प्रवाशांचे प्राण वाचणे --- राष्ट्रपतींद्वारा मुलाचा सन्मान – तात्पर्य.

**इ) खालीलपैकी एक कृती सोडवा.** ८

१) **आत्मकथन** – दिलेल्या चित्रातील घटक महामार्गावरील सूचनाफलक तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करुन आत्मकथन करा.

⊡ वाहने हळू चालवा.
⊡ पुढे एक किलोमीटरचा घाट आहे.
⊡ गरज पडेल तेव्हा सतत कर्ण भोंगा वाजवा.
⊡ गतिरोधकावर वाहनाची गती कमी करा.
⊡ वाहन चालवताना भ्रमणध्वनी बंद ठेवा.
⊡ लक्षात ठेवा – 'नाही पेक्षा उशीर बरा'.

२) **वैचारिक लेखन** – राष्ट्रीय एकात्मता – भारत देशाची प्राचीन परंपरा ---- संस्कृती ---- इतिहास ---- भाषा, वेश, धर्म वेगळे तरीही एक ---- संतांची परंपरा ---- परकीय आक्रमण ---- प्रगती, विकास ---- शिकवण.

३) **प्रसंग लेखन** – माझ्या शाळेतील स्नेहसंमेलन.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संमेलनाची तयारी | | सांस्कृतिक कार्यक्रम | | प्रमुख पाहुणे |
| | जोश, उत्साह | | धावपळ | |